मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# एक तास स्वच्छता मोहिमेत ४० हजारांहून अधिक नागरिकांनी घेतला सहभाग!

## सहभागींना स्वच्छतेबाबत देण्यात आली शपथ



**पिंपरी-चिंचवड।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**

महात्मा गांधीं यांच्या जयंती पुर्वी देशभरात ‘स्वच्छता ही सेवा’ अभियानांतर्गत श्रमदान केले जात आहे. या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने आज सकाळी १० ते ११ या वेळेत ‘एक तास स्वच्छतेसाठी’ उपक्रम राबविण्यात आला. शहराला कचरामुक्त करून स्वच्छ सुंदर बनविण्यासाठी प्रत्येक नागरिकामध्ये स्वच्छतेची भावना निर्माण व्हावी यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरात एक तास स्वच्छता मोहिमेत ४० हजारांहून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला होता. यावेळी सहभागींना स्वच्छतेबाबत शपथ देण्यात आली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ‘स्वच्छता हीच सेवा’ या राष्ट्रीय अभियानांतर्गत संपूर्ण शहरात राबविण्यात आलेल्या ‘एक तास स्वच्छतेसाठी’ या स्वच्छता मोहिमेची सुरुवात अ क्षेत्रिय कार्यालयाच्या वतीने पिंपरी येथील शगुन चौकातून स्वच्छतेची शपथ घेऊन करण्यात आली. आयुक्त शेखर सिंह यांच्या उपस्थितीमध्ये आणि आमदार उमा खापरे त्याचप्रमाणे माजी उपमहापौर हिरानंद उर्फ डब्बू आसवाणी, माजी नगरसदस्य संदीप वाघेरे, माजी नगरसेविका अनुराधा गोरखे, निकिता कदम, सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे, क्षेत्रीय अधिकारी सुचिता पानसरे यांच्या उपस्थितीत अधिकारी, कर्मचारी आणि स्वयंसेवी संस्था, विविध संघटना, विद्यार्थी, मंडळे, गृहनिर्माण संस्था व स्थानिक नागरिकांनी शपथ घेतली आणि पिंपरी चौक व परिसरात स्वच्छता केली. तसेच अ क्षेत्रिय कार्यालयाच्या वतीने इतर ठिकाणी झालेल्या स्वच्छता मोहिमेस माजी महापौर मंगला कदम, सह शहर अभियंता श्रीकांत सवणे, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, माजी उपमहापौर शैलजा मोरे, माजी नगरसेवक केशव घोळवे, सुनील कदम, माजी नगरसेविका मीनल यादव, शर्मिला बाबर उपस्थित होते. ब क्षेत्रीय कार्यालय येथे स्वच्छता मोहिमेत माजी नगरसदस्य नामदेव ढाके, राजेंद्र साळुंखे, राजाभाऊ गोलांडे, ॲड. मोरेश्वर शेडगे, गोविंद पानसरे, सुरेश भोईर, राजेंद्र गावडे, बिभीषण चौधरी तर नगरसदस्या संगिता भोंडवे, आश्विनी चिंचवडे, ज्योती भारती, उमा काळे क्षेत्रीय अधिकारी अमित पंडित कार्यकारी अभियंता जहीरा मोमीन आदी उपस्थित होत्या. क क्षेत्रिय कार्यालयाच्या वतीने गाव जत्रा मैदान भोसरी येथे आमदार महेश दादा लांडगे, अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, उपायुक्त रविकिरण घोडके, माजी नगरसेवक संतोष लोंढे, राजेंद्र लांडगे, सागर गवळी, विलास मडिगेरी,

### स्वच्छतेची शपथ घेऊन सुरुवात

**» पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने ‘स्वच्छता हीच सेवा’ या राष्ट्रीय अभियानांतर्गत संपूर्ण शहरात राबविण्यात आलेल्या ‘एक तास स्वच्छतेसाठी’ या स्वच्छता मोहिमेची सुरुवात अ क्षेत्रिय कार्यालयाच्या वतीने पिंपरी येथील शगुन चौकातून स्वच्छतेची शपथ घेऊन करण्यात आली.**

माजी नगरसेविका सोनाली गव्हाणे, निर्मला गायकवाड, नम्रता लोंढे, सारीका लांडगे, क्षेत्रीय अधिकारी अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता आबासाहेब ढवळे, सुनील बागवानी, अविरत श्रमदान संस्थेचे अध्यक्ष डॉ. निलेश लोंढे ,संदीप बेलसरे, टाटा मोटर्स कंपनीचे कर्नल संजय कर्णिक व त्यांचे २०० स्वयंसेवक यांच्यासह नागरिक मोठ्या संखेने या स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते. ड क्षेत्रिय कार्यालयाच्या वतीने स्वच्छता मोहिमेत आमदार अश्विनी जगताप, अतिरिक्त आयुक्त प्रदिप जांभळे पाटील, माजी नगरसेवक शंकर जगताप, अंबरनाथ कांबळे, शत्रुघ्न काटे, विठ्ठल उर्फ नाना काटे, विनायक गायकवाड, राजेंद्र जगताप, शशिकांत कदम, सागर आंघोळकर, माजी नगरसेविका उषा मुंढे, आरती चोंधे, निर्मला कुटे क्षेत्रीय अधिकारी किरण मोरे उपस्थित होते. इ क्षेत्रिय कार्यालयाच्या वतीने बैलगाडा मैदान भोसरी येथे आमदार महेश लांडगे, अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, माजी नगरसेवक अँड. नितिन लांडगे, संतोष लोंढे, राजेंद्र लांडगे, सागर गवळी, विकास डोळस, हिराबाई उर्फ नानी घुले, माजी नगरसेविका सोनाली गव्हाणे, निर्मला गायकवाड, नम्रता लोंढे, क्षेत्रीय अधिकारी अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता आबासाहेब ढवळे, सुनील बागवानी, अविरत श्रमदान संस्थेचे अध्यक्ष डॉ. निलेश लोंढे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने या स्वच्छता मोहिमेत सहभागी झाले होते. फ क्षेत्रिय कार्यालयाच्या माजी नगरसेवक एकनाथ पवार, शांताराम भालेकर, संजय नेवाळे, सचिन चिखले, प्रा.उत्तम केंदळे, पंकज भालेकर, प्रविण भालेकर, बापू घोलप, धनंजय भालेकर, माजी नगरसेविका सुलभा उबाळे, संगीता ताम्हाणे, योगिता नागरगोजे, उपायुक्त मनोज लोणकर, सह शहर अभियंता ज्ञानदेव जुंधारे, सामाजिक कार्यकर्ते सचिन सानप उपस्थित होते . ग क्षेत्रिय कार्यालयाच्या वतीने स्वच्छता मोहिमेत खासदार श्रीरंग आप्पा बारणे, सह आयुक्त चंद्रकांत इंदलकर, माजी नगरसेविका विमल जगताप, मनिषा पवार, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य शशिकांत पाटील, विशेष अधिकारी किरण गायकवाड, क्षेत्रीय अधिकारी शितल वाकडे, कार्यकारी अभियंता अकबर शेख, सहाय्यक आरोग्य अधिकारी अविनाश दरवडे, सामाजिक कार्यकर्ते विश्वजीत बारणे, महिला बचत गटांच्या प्रतिनिधी, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे शिक्षक विद्यार्थी, महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी कर्मचारी, मराठवाडा मित्र मंडळाच्या औषधशास्त्र महाविद्यालयाचे विद्यार्थी, तसेच विविध शाळांतील विद्यार्थी, विविध संघटनांचे प्रतिनिधी आणि परिसरातील नागरिक उपस्थित होते. ह क्षेत्रीय कार्यालयांतर्गत झालेल्या स्वच्छता मोहिमेमध्ये माजी नगरसेवक शंकर जगताप, अंबरनाथ कांबळे, शाम लांडे, सागर आंघोळकर, महेश जगताप, तर नगरसदस्या स्वाती उर्फ माई काटे, आशा धायगुडे शेंडगे, ‘सुजाता पालांडे, शारदा सोनवणे उपस्थित होत्या. या उपक्रमात लोकप्रतिनिधी, विद्यार्थी, शिक्षक, महिला बचतगट, स्वच्छतादूत तसेच अधिकारी, कर्मचारी, अशासकीय व शासकीय संस्था, औद्योगिक कंपन्या, रिक्षा संघटना, टपरी, पथारी हातगाडी संघटना, फेरीवाले, धार्मिक संस्था, गणेश मंडळे, पर्यावरण प्रेमी, ज्येष्ठ नागरिक संघ, व्यावसायिक, स्वयंसेवी संस्था आदींनी सक्रीय सहभाग नोंदविला आणि शहर स्वच्छतेचा संदेश दिला.

# विधायक उपक्रमांनी निलेश नेवाळे यांचा वाढदिवस साजरा!

## निलेश दादा नेवाळे फौंडेशनच्या वतीने पांजरपोळ येथील गोशाळेत चारावाटप

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे यांच्या वाढदिवसा निमित्त निलेशदादा नेवाळे सोशल फाऊंडेशनच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिर, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, चष्मे वाटप, आयुष्यमान भारत कार्डचे वाटप यासह पांजरपोळ येथील गोशाळेत चारावाटप व आनंदघन वृद्धाश्रम येथे धान्यवाटप असे विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. दरवर्षीप्रमाणे सामाजिक कार्यकर्ते निलेश नेवाळे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले




होते. शिवतेजनगर येथे शुक्रवारी सकाळी १० पासून चेरी चौकात मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये हजारो नागरिकांची मोफत नेत्र तपासनी करण्यात आली. तसेच नागरिकांना मोफत चष्मे देखील वाटप करण्यात आले. सुमारे ८७२ गरजवंतांना यावेळी चष्म्याचे वाटप करण्यात आले. यावेळी मोतीबिंदू शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या नागरिकांची तपासणी करण्यात आली, त्यामध्ये सुमारे ६३ नागरिकांच्या मोतीबिंदूचे निदान झाले. यावेळी आयुष्यमान भारत कार्डचे ही वाटप करण्यात आले. शिबिराचा परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला. यावेळी केंद्रशासन पुरस्कृत आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत सुमारे १८५४ नागरिकांना हेल्थ कार्ड चे वाटप करण्यात आले. प्रभागातील नागरीक यांची नेत्र तपासणी करुन मोफत चष्मे वाटप मोतीबिंदु झालेल्या रुग्णांना निलेश दादा नेवाळे फौंडेशन आणि भारती हॉस्पीटल तसेच माई मेडिकल फौडेशन च्या वतीने मोफत शस्त्रकिया करण्यात येणार आहेत. दरम्यान, निलेश दादा नेवाळे फौंडेशनच्या वतीने पांजरपोळ येथील गोशाळेत चारावाटप करण्यात आले तर आनंदघन वृद्धाश्रम येथे धान्यवाटप करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी भेट देऊन निलेश नेवाळे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

### हजारो नागरिकांची नेत्र तपासणी

» शिवतेजनगर येथे शुक्रवारी सकाळी १० पासून चेरी चौकात मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये हजारो नागरिकांची मोफत नेत्र तपासनी करण्यात आली. तसेच नागरिकांना मोफत चष्मे देखील वाटप करण्यात आले. सुमारे ८७२ गरजवंतांना यावेळी चष्म्याचे वाटप करण्यात आले. यावेळी आयुष्यमान भारत कार्डचे ही वाटप करण्यात आले. शिबिराचा परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घेतला.

# वादळी पावसामुळे मागील २४ तासात तीन ठिकाणी झाडे पडली!

## अग्निशमन दलाने घटनास्थळी जाऊन पडलेले झाड बाजूला केले

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पिंपरी चिंचवड शहरात अधूनमधून वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे. मागील २४ तासात आलेल्या अशा पावसामुळे आकुर्डी, निगडी प्राधिकरण आणि काळेवाडी या तीन ठिकाणी झाडे पडली आहेत. अग्निशमन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास विशाल राठोड यांनी गंगानगर कॉर्नर, आकुर्डी गावठाण येथील वॉशिंग सेंटर जवळ झाड पडल्याबाबत माहिती दिली. त्यानुसार प्राधिकरण अग्निशमन दलाने घटनास्थळी जाऊन रस्त्यावर पडलेले झाड



बाजूला केले. त्यानंतर दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास प्रस्तावित महापौर निवासस्थाना लगतच्या जागेवरील झाड पडल्याची माहिती माजी नगरसेविका शर्मिला बाबर आणि भाजपचे पदाधिकारी अनुप मोरे यांनी अग्निशमन विभागाला दिली. हे झाड सिमाभिंतीच्या कठड्याला अडकले असल्याने ते झाड पडून अपघात होण्याची शक्यता होती. त्यामुळे ते झाड कापून काढण्यात आले. यामुळे संभाव्य अपघात टळला. झाड पडल्याची तिसरी घटना रविवारी (दि. १) सकाळी ९.३४ वाजता काळेवाडीतील तापकीर नगरमधील श्रीशक्ती कॉलनी येथे घडली. संजय राठोड यांनी याबाबत माहिती दिली. मात्र हे झाड नाला आणि सोसायटीची सिमाभिंत या दरम्यान पडले होते. अधांतरी असलेले हे झाड कापण्याबाबत उद्यान विभागाला कळविण्यात आले आहे.

# मिरवणुकीत १०८ मंडळांनी ओलांडली आवाजाची पातळी

**पिंपरी-चिंचवड। न्यूज एक्स्प्रेस मराठी।** उद्योगनगरीत साडेआठ तास चाललेल्या गणेश विसर्जन मिरवणुकीत 'डीजे'च्या दणदणाटाने कानठळ्या बसवल्या. तब्बल १०८ मंडळांनी ठरवून दिलेली आवाजाची ७० डेसिबलची पातळी ओलांडली. या सर्व मंडळावर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे. याविषयीचा अहवाल पोलिस न्यायालयात सादर करणार आहेत. गुरुवारी (दि.२८) गणेश विसर्जन मिरवणुकीवेळी मंडळांच्या आवाजाची पातळी मोजण्याचे काम पोलिस प्रशासनाकडून करण्यात आले. ज्या मंडळांनी 'डीजे'चा आवाज वाढवली त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे. यंदा १०८ मंडळांनी आवाजाची पातळी ओलांडल्याचे सांगण्यात आले आहे. पुणे शहरात गणेशोत्सवातील आवाजाची पातळी मोजण्याचे काम दरवर्षी सीईओपी कडून होते. मात्र, पिंपरी-चिंचवडमध्ये आवाज मोजण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा नाही. पोलिसांकडूनच याची नोंद ठेवली जाते. नियमानुसार रात्री ७० डेसिबलपेक्षा जास्त आवाज नसावा, तसेच मनुष्यवस्ती असलेल्या ठिकाणी याहून कमी आवाजाची मर्यादा आहे. मात्र, यंदा गणेशोत्सवाच्या मिरवणुकीत आवाजाने १०० डेसिबल पार केल्याचे निरीक्षण नोंदवण्यात आले आहे.

> **“** पिंपरी पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत १०८ मंडळांनी आवाजाची मर्यादा ओलांडली आहे. या मंडळांचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे. मर्यादा ओलांडणाऱ्या मंडळाचा अहवाल तयार करून तो न्यायालयात सादर केला जाणार आहे. एका मंडळावर खटला दाखल करण्यात आला आहे.
>
> **– सतीश माने,**
> **सहायक पोलिस आयुक्त, पिंपरी-चिंचवड**

# पीएमपी-मेट्रो प्रवास एकाच तिकिटात!

## पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांचे मत



**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** डिजिटल व्यवहार वाढले पाहिजेत, अशी पंतप्रधान मोदी यांची इच्छा आहे. जगात सगळ्यात जास्त डिजिटल व्यवहार आज भारतात होत आहेत. परंतु पीएमपीएल या डिजिटल व्यवहारात मागे आहे. त्यामुळे पीएमपी आणि मेट्रो यांची तिकिट यंत्रणा एकत्र करण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू आहेत, असे मत पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी रविवारी व्यक्त केले. डिजिटल इंडिया या उपक्रमांतर्गत पीएमपीएमएल मध्ये रविवार पासून क्यू आर कोड म्हणजेच गुगल पे तिकिट यंत्रणा सुरू करण्यात आली आहे. या सेवेचा शुभारंभ कोथरूड येथे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी ते बोलत होते. यावेळी पुणे महानगर परिवहन महामंडळाचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक सचिन्द्र प्रताप सिंह, सहव्यवस्थापकीय संचालक नितीन नार्वेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी प्रज्ञा पोतदार पवार, माजी नगरसेवक गणेश वरपे, नवनाथ जाधव,अजय मारणे, किरण दगडे-पाटील,अल्पना वरपे, नितीन शिंदे, वैभव मुरकुटे, मंदार जोशी इ. उपस्थित होते.

> **'पीएमपीएलची यंत्रणा इतकी सक्षम व्हावी की लोकांना खासगी वाहनाचा वापरच करावा लागू नये. घरापासून पीएमपीएलने मेट्रो स्टेशन, तिथून मेट्रोन कार्यालय आणि पुन्हा पीएमपीएलने घरी अशी व्यवस्था झाली तरच खासगी वाहनांचा वापर कमी होईल.' कर्मचारी समाधानी राहिले तरच संस्था सक्षम राहते. त्यामुळे पीएमपीएलच्या कर्मचाऱ्यांना अधिकाधिक सुविधा देण्यासाठी हे सरकार प्रयत्न करत आहे. यातून एक चांगली सार्वजनिक वाहतूक व्यवस्था उभी राहील**
> **-चंद्रकांत पाटील, पालकमंत्री, पुणे**

# गेलेले लवकरच परत येतील!

## राजकीय पक्ष चोरण्याची नवी पद्धत रुजतेय

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की,कोणत्याही पक्षाचे आमदार दुसरीकडे जातअसतील तर त्यांच्यासोबत पक्ष जाईल हीभावना चुकीची आहे. आमच्यासोबतभरपूर आमदार आहेत. जे झाले ते चुकीचेअशी भावना ते व्यक्त करत आहेत.आगामी काळात ते आमच्यासोबतराहतील. काही आमदार लवकरच परतयेतील. शरद पवारांनी निवडणूकआयोगाला आमची बाजू ऐकून घ्यावी असेसांगितले. मात्र, अचानक सहा ऑक्टोबरतारीख देण्यात आलेली आहे. दुसरा गटशरद पवार हेच पक्षाचे अध्यक्ष असल्याचेसांगून नंतर वेगळी भूमिका मांडत आहे.लोकसभा, विधानसभा निवडणुका सहा तेदहा महिन्यांनी होत असल्याने सुजाणआयोगाने तातडीने योग्य निर्णय घ्यावा,अशी अपेक्षा असल्याचे पाटील म्हणाले. त्यांची भरपाई सरकारने सर्वेक्षणानंतर केली पाहिजे. ओबीसींवर अन्याय होतो अशीभावना सध्या निर्माण होत आहे. या सरकारने ओबीसी यांच्यावर अन्याय करू नये. जळगावात नायब तहसीलदार कंत्राटी पद्धतीने भरतीचा निर्णय झाला. त्यावर त्यांनीसांगितले की, कंत्राटी भरती म्हणजे मुलांच्या भवितव्याशी खेळ आहे. कंत्राटी नायबतहसीलदार जबाबदारीने काम करणार नाहीत. महत्त्वाच्या पदांवर अशी भरती होतअसेल तर सरकारच कंत्राटावर चालवावे. सध्या राज्यामध्ये राजकीय पक्ष पळवणारी आणि राजकीय पक्ष चोरण्याची पद्धत रुजत आहे. पक्ष स्थापन करणाऱ्याला संस्थापक अध्यक्षपदावरून दूर करत पक्ष आमच्या ताब्यात असल्याचा आविर्भाव काही जण मांडत आहेत, अशी टीका राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली. पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, कोणत्याही पक्षाचे आमदार दुसरीकडे जात असतील तर त्यांच्यासोबत पक्ष जाईल ही भावना चुकीची आहे. आमच्यासोबत भरपूर आमदार आहेत. जे झाले ते चुकीचे अशी भावना ते व्यक्त करत आहेत. आगामी काळात ते आमच्यासोबत राहतील. काही आमदार लवकरच परत येतील. शरद पवारांनी निवडणूक आयोगाला आमची बाजू ऐकून घ्यावी असे सांगितले. मात्र, अचानक सहा ऑक्टोबर तारीख देण्यात आलेली आहे. दुसरा गट शरद पवार हेच पक्षाचे अध्यक्ष असल्याचे सांगून नंतर वेगळी भूमिका मांडत आहे. लोकसभा, विधानसभा निवडणुका सहा ते दहा महिन्यांनी होत असल्याने सुजाण आयोगाने तातडीने योग्य निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा असल्याचे पाटील म्हणाले.



### मंत्रालयात ओबीसींच्या जागा भराव्या

**» पाटील म्हणाले, मंत्रालयात ओबीसींच्या काही जागा रिक्त आहेत असे सांगण्यात येते.त्यांची भरपाई सरकारने सर्वेक्षणानंतर केली पाहिजे. ओबीसींवर अन्याय होतो अशीभावना सध्या निर्माण होत आहे. या सरकारने ओबीसी यांच्यावर अन्याय करू नये. जळगावात नायब तहसीलदार कंत्राटी पद्धतीने भरतीचा निर्णय झाला. त्यावर त्यांनीसांगितले की, कंत्राटी भरती म्हणजे मुलांच्या भवितव्याशी खेळ आहे. कंत्राटी नायबतहसीलदार जबाबदारीने काम करणार नाहीत.**

# लोणावळ्यात पर्यटकांची झुंबड!

**पुणे। न्यूज एक्सप्रेस मराठी।** अनंत चतुर्दशीपासून आलेल्या सलग सुट्ट्यांमुळे लोणावळा, खंडाळा परिसरात रविवारी पर्यटकांची गर्दी झाली आहे. मोठ्या संख्येने पर्यटक मोटारीतून लोणावळ्यात दाखल झाल्याने मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर कोंडी झाली. भुशी धरण, लायन्स पॉईंटकडे जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. गणेशोत्सवानंतर सलग सुट्ट्या आल्याने शनिवारी सायंकाळनंतर लोणावळ्यात पुणे, मुंबईसह राज्याच्या वेगवेगळ्या भागातून पर्यटक दाखल होण्यास सुरुवात झाली. रविवारी (१ ऑक्टोबर) सकाळपासून खंडाळा येथील राजमाची गार्डन, खंडाळा तलाव, लायन्स पॉईंट, भुशी धरण परिसरात पर्यटकांची गर्दी झाली होती. पहाटे लोणावळा, खंडाळा परिसरात जोरदार पाऊस झाल्याने धबधबे वाहू लागल्याने पर्यटकांचा आनंद द्विगुणीत झाला. दिवसभर ढगाळ वातावरण, तसेच दाट धुके पडले होते. तुंगार्ली धरण, बाळू मामा मंदिर परिसरात पर्यटक आले होते. मावळातील कार्ला लेणी, भाजे लेणी, लोहगड किल्ला, विसापूर किल्ला, पवना धरण परिसरात पर्यटकांनी गर्दी केली. सलग सुट्ट्या आल्याने लोणावळा शहर, तसेच परिसरातील हॉटेलमधील खोल्या पर्यटकांना आरक्षित केल्या होत्या. खासगी फार्म हाऊस, पर्यटन महामंडळाचे निवास केंद्र आरक्षित करण्यात आले होते. मोठ्या संख्येने पर्यटक मोटारीतून दाखल झाल्याने लोणावळा शहर परिसरात कोंडी झाली होती. शहर आणि ग्रामीण भागातील कोंडी सोडविण्यासाठी लोणावळा शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सीताराम डुबल, ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली बंदोबस्त ठेवण्यात आला होता. रविवारी (१ ऑक्टोबर) सकाळपासून खंडाळा येथील राजमाची गार्डन, खंडाळा तलाव, लायन्स पॉईंट, भुशी धरण परिसरात पर्यटकांची गर्दी झाली होती. पहाटे लोणावळा, खंडाळा परिसरात जोरदार पाऊस झाल्याने धबधबे वाहू लागल्याने पर्यटकांचा आनंद द्विगुणीत झाला.

# धनगर समाजाच्यावतीने रास्ता रोको!

## एसटी प्रवर्गात आरक्षणाची अंमलबजावणी करण्याची मागणी



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** धनगर समाजाला एसटी प्रवर्गात आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी, या मागणीसाठी खंडाळा (ता. वैजापूर) येथे धनगर समाज संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने शनिवारी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी शेकडो मेंढ्यांना सोबत घेऊन सकल धनगर समाज रस्त्यावर उतरला होता. या वेळी धनगर समाज (एसटी) प्रवर्गात आरक्षणाची लवकर अंमलबजावणी करावी, जे आदिवासींना ते धनगर समाजाला या तत्त्वावर सरकारने धनगर समाजासाठी दहा हजार कोटींची तरतूद केली त्याचे त्वरित वितरण करावे, गरीब धनगर समाज कार्यकर्त्यांने राधाकृष्ण विखे पाटील यांना भंडारा लावला म्हणून त्याला मारहाण केली म्हणून राधाकृष्ण विखे पाटील यांना निलंबित करावे या प्रमुख मागण्यांचे निवेदन तलाठी सुखदेव राठोड, पोलिस उपनिरीक्षक राम घाडगे यांच्याकडे दिले. दरम्यान, वैजापुरातील वंचित बहुजन आघाडी, समता परिषद व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने पाठिंबा दर्शवत सहभाग नोंदवला. आंदोलनात जिल्हाध्यक्ष बाळासाहेब जानराव, वंचितचे अंकुश पठारे, अमोल बागूल, समता परिषदेचे बाळासाहेब शिंदे, मनसेचे सुनील गायकवाड, गणेश ढगे, विठ्ठल ढगे, संजय बागूल, कैलास वेळंजकर, बाबासाहेब जानराव, विजय ढगे, संतोष ढगे, नामदेव ढगे, रवींद्र जानराव, संजय जानराव, सोमनाथ जानराव, गणेश जानराव, गोरखनाथ जानराव, संजय कवार, सतीश कवार, बाळासाहेब ढगे, शिवाजी जानराव, , राजेंद्र जानराव आदी सहभागी होते.

### शेकडो मेंढ्यांना सोबत रस्त्यावर

» धनगर समाजाला एसटी प्रवर्गात आरक्षणाची अंमलबजावणी व्हावी, या मागणीसाठी खंडाळा (येथे धनगर समाज संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने शनिवारी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी शेकडो मेंढ्यांना सोबत घेऊन सकल धनगर समाज रस्त्यावर उतरला होता. या वेळी धनगर समाज (एसटी) प्रवर्गात आरक्षणाची लवकर अंमलबजावणी करावी, जे आदिवासींना ते धनगर समाजाला या तत्त्वावर सरकारने धनगर समाजासाठी दहा हजार कोटींची तरतूद केली त्याचे त्वरित वितरण करावे.

# स्वच्छतेसाठी 'एक तारीख एक तास' उपक्रम!

## पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांचे श्रमदान



**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** स्वच्छता हीच सेवा या अभियानांतर्गत स्वच्छतेसाठी 'एक तारीख एक तास' या उपक्रमात पुणे महानगरपालिकेच्यावतीने आयोजित वॉकेथॉनमध्ये सहभागी होऊन पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी हाती झाडू घेत श्रमदान केले. स्वच्छता ही लोकचळवळ झाली असून स्वच्छतेबाबतची आपल्या देशाविषयीची प्रतिमा बदलत आहे, असे प्रतिपादन मंत्री पाटील यांनी केले. यावेळी पुणे महानगर पालिकेचे आयुक्त विक्रम कुमार, अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार, विकास ढाकणे, घनकचरा व्यवस्थापन उपायुक्त संदीप कदम यांच्यासह महानगरपालिकेचे विविध विभागप्रमुख उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री पाटील म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी हे अनेक विषयामध्ये सर्वसामान्य नागरिकांना जोडून घेत त्याची लोकचळवळ निर्माण करण्यात यशस्वी झाले आहेत. गेल्या साडेनऊ वर्षात सर्वसामान्यांना स्वच्छता मोहिमेशी जोडत आपल्या देशाची स्वच्छतेबाबतची प्रतिमा बदलली आहे.आज शहरात साडेतीनशे पेक्षा जास्त ठिकाणी स्वच्छतेसाठी उपक्रम राबविण्यात आला. यात दीड लाखाहून अधिक लोक सहभागी झाले आहेत हे या अभियानाचे यश आहे. सर्व विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा, विविध संस्था, कारखाने, स्वयंसेवी संस्था यात सहभागी झाले असून लोकसहभागाचे मोठे यश अभियानाला लाभले आहे. यातूनच स्वच्छतेची सवय निर्माण होण्यास मदत होते, असेही ते म्हणाले. 'स्वच्छता हीच सेवा' उपक्रमाअंतर्गत पुणे महापालिकेच्या वतीने आयोजित वॉकेथॉनमध्ये महापालिका परिसर, शनिवार वाडा, भिडे पूल आदी ठिकाणी पालकमंत्री यांनी सर्वांसोबत सहभागी होत स्वच्छता केली. यावेळी त्यांनी उपस्थितांना स्वच्छता विषयक शपथ दिली तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

### दीड लाखाहून अधिक लोक सहभागी

» गेल्या साडेनऊ वर्षात सर्वसामान्यांना स्वच्छता मोहिमेशी जोडत आपल्या देशाची स्वच्छतेबाबतची प्रतिमा बदलली आहे.आज शहरात साडेतीनशे पेक्षा जास्त ठिकाणी स्वच्छतेसाठी उपक्रम राबविण्यात आला. यात दीड लाखाहून अधिक लोक सहभागी झाले आहेत हे या अभियानाचे यश आहे. सर्व विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा, विविध संस्था, कारखाने, स्वयंसेवी संस्था यात सहभागी झाले असून लोकसहभागाचे मोठे यश अभियानाला लाभले आहे.

# ससून रुग्णालय परिसरात कोटींचे अमली पदार्थ जप्त!

**पुणे । न्यूज एक्स्प्रेस मराठी।** पुण्यातील प्रसिद्ध ससून रुग्णालय परिसरात अमली पदार्थ विरोधी पथकाने कारवाई करून तब्बल दोन कोटी रुपये किंमतीचे मेफेड्रोन (एमडी)हा अमली पदार्थ जप्त केला आहे. या कारवाईत पोलिसांनी एका मोठ्या अमली पदार्थ तस्करासह तिघां आरोपीना ताब्यात घेतले आहे.शासकीय ससून रुग्णालयाच्या प्रवेशद्वारावर झालेल्या या कारवाईमुळे खळबळ उडाली आहे. या रुग्णालयातील कैदी ठेवण्यात येत असलेल्या न्यायालयीन वार्डमध्ये हे दोन किलो ५५७ ग्रॅम अमली पदार्थ नेले जात होते अशी धक्कादायक माहिती पोलिसांना मिळाली होती. त्याबाबतची गोपनीय माहिती मिळाल्यावर पुणे शहर गुन्हे अन्वेषण विभागाचे सहायक पोलीस आयुक्त सतीश गोवेकर, अमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक सुनील थोपटे व त्यांच्या पथकाने रुग्णालय परिसरात सापळा रचून तिघां आरोपीना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे एका पिशवीमध्ये संबधित अमली पदार्थ पोलिसांना मिळून आले आहे.याप्रकरणात अमली पदार्थ विक्रीतील मोठा तस्कर ललित पटेल याला पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले आहे. त्याच्यासमवेत रुग्णालयातील कँटीनमध्ये काम करत असलेल्या एका कंत्राटी कामगारालाही ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्यामार्फत रुग्णालयात दाखल असलेल्या एका कैद्याकडे हे अमली पदार्थ पोचवले जात असल्याची माहिती प्राथमिक तपासात समोर आली आहे.नेमके हे अमली पदार्थ कोठून आणले जात होते, त्याचे पैसे कशाप्रकारे देण्यात होते, या तस्कर साखळीमध्ये पोलीस खात्या अंतर्गत कोणी कर्मचारी सहभागी आहे किंवा कसे याबाबतचा तपास अमली पदार्थ विरोधी पथकाकडून करण्यात येत आहे.